ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II ISSUE-II Feb. 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
| Vol - II | Issue - II | February | 2015 | Monthly | ISSN 2349-638X |
|---|---|---|---|---|---|

# अंबाजोगाई तालूक्यातील शिक्षक संघटना, विद्यार्थ्यांसाठी राबवत असलेल्या उपक्रमांचा अभ्यास

**मार्गदर्शक**
**डॉ.अंधारे एस.जी.**
उपकूलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपकेद्र, लातूर

**संशोधक**
**गित्ते त्रिंबक गोविंद**
संशोधक विद्यार्थी
स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

## प्रस्तावना :–

संघटना एक शक्ति असते. आज प्रत्येक क्षेत्रात संघटनांचे महत्व वाढत आहे. शिक्षण क्षेत्रातही विविध संघटना कार्यरत आहेत. जसे शिक्षकांची संघटना, विद्यार्थी संघटना, शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, शिक्षक संघटना हया शिक्षकांच्या प्रश्नासोबत विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्नशील असतात. विद्यार्थ्यांच्या संर्वांगीण विकास व्हावा यासाठी संघटना विविध उपक्रम राबवताना दिसतात. हे उपक्रम संघटनेचा वर्धापन दिन, पदाधिका—यांचा वाढदिवस या निमित्त आयोजित केले जातात. त्यातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सांस्कृतिक, शारीरिक, बौध्दिक विकासाला चालना मिळते.

## संशोधनाची उद्दिष्टे:–

1. अंबाजोगाई तालूक्यातील कार्यरत असलेल्या शिक्षक संघटनांचा शोध घेणे.
2. अंबाजोगाई तालूक्यातील विद्यार्थ्यांसाठी संघटनेतर्फे राबवत असलेल्या उपक्रमांचा शोध घेणे.
3. अंबाजोगाई तालूक्यातील विद्यार्थ्यांसाठी संघटने तर्फे राबवत असलेल्या उप्रक्रमाचीं परिणामकारकता अभ्यासणे.

**संशोधनाची गरज :–**

अंबाजोगाई तालूक्यातील शिक्षक संघटना कार्यरत आहे. संघटना शिक्षकांसोबतच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे हि लक्ष देतात. विद्यार्थ्यांसाठी संघटना तर्फे विविध उपक्रम राबवतात यातून विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळतो. म्हणून संघटनांनी विद्यार्थ्यांविषयी केलेल्या कार्याचा शोध घेण्यासाठी प्रस्तूत संशोधन गरजेचे आहे.

**संशोधनाचे महत्व :–**

प्रस्तूत संशोधनतून संघटनां विद्यार्थ्यांसाठी कोणकोणत्या प्रकारेचे उपक्रम राबवतात च कोणते उपक्रम दुर्लक्षित आहेत याबाबत स्पष्ट कल्पना येईल. राबवलेल्या उपक्रमाची परिणामकारकता तपासता येईल.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तूत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीने केले आहे.

**संशोधन न्यादर्श :–**

प्रस्तूत संशोधनासाठी प्राथमिक शिक्षक संघ व डॉ. पंजाबराव देशमूख राष्ट्रिय विकास परिषदेच्या प्रत्येकी 50 असे 100 शिक्षक सभासदांची निवड केली आहे.

**संशोधन साधनः–**

प्रस्तूत संशोधनामध्ये माहिती संकलनासाठी प्रश्नावली व मूलाखत या साधनांचा वापर केला आहे.

**सांख्यिकी परिमाणेः–**

प्रस्तूत संशोधनामध्ये माहिती विश्लेषणासाठी शेकडेवारीचा वापर केला आहे.

## संशोधनाची निष्कर्ष :–

1. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी संघटना कार्य करतात.
2. विद्यार्थ्यांसाठी संघटना विविध उपक्रमांचे आयोजन करतात.
3. विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञान वाढीसाठी सामान्य ज्ञान स्पर्धा घेतल्या जातात.
4. विद्यार्थ्यांच्या शारीरिक सदृढतेसाठी मैदानी खेळाच्या स्पर्धा घेतल्या जातात.
5. विद्यार्थ्यांमध्ये सभाधिटपणा विकसित होण्यासाठी वकृत्व, चर्चा, वाद–विवाद स्पर्धांचे आयोजन केले जाते.
6. सामाजिक विकासासाठी स्वच्छता माहिम राबवली जाते.
7. सांस्कृतिक कलागुणांना वाव मिळवण्यासाठी चित्रकला, रांगोळी गायन, नृत्य स्पर्धा आयोजित केल्या जातात.

## संदर्भ ग्रथ सूचीः–

1. शिक्षणातील नव विचार प्रवाह सहशालेय उपक्रम (1990) यशवंतराव चव्हाण मूक्त विद्यापीठ, नाशिक.
2. देशपांडे कृ.प. (1990) शिक्षकांसाठी सहशालेय उपक्रम संच पहिला, पुणे.
3. करंदिकर सुरेश, मंगरूळकर मिरा (2005) उदयान्मुख भारतीय समाजीतील शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
4. पारसनिस न.रा. (2009) शिक्षकांचे प्रशिक्षण, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.